# यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार व सद्य:स्थितीत भारताच्या विकास प्रक्रियेत त्यांची उपयुक्तता

**प्रा. डॉ. तेजस्विनी बी. मुडेकर**

असोसिएट प्रोफेसर,

अर्थशास्त्र विभाग प्रमुख ,

कमला कॉलेज, कोल्हापूर

---

## प्रास्ताविक :

आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण करणारे शिल्पकार, एक मुत्सद्दी, मुरब्बी नेता म्हणून यशवंतराव चव्हाण ओळखले जातात. १९५६ मध्ये द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री आणि १ मे १९६० रोजी जेव्हा संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली तेव्हा महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांनी समर्थपणे सूत्रे हाती घेतली. देवराष्ट्रेसारख्या खेडयात, गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या यशवंतरावांनी स्वकर्तृत्वाच्या बळावर भारताचे गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, उपपंतप्रधान आणि आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष ही पदे मिळविली. या प्रत्येक पदावर काम करताना त्यांची वैचारिक बैठक पक्की होती. त्यांनी दूरदृष्टीने वेळोवेळी घेतलेले निर्णय देश व राज्यहितास पोषकच ठरल्याचे दिसते. यशवंतरावांच्या आर्थिक विचारांचा परामर्श घेत असताना त्यांचे तत्कालीन निर्णय, आर्थिक विचार हे आजच्या जागतिकीकरणाच्या युगात भारताच्या विकास प्रक्रियेत कसे उपयुक्त ठरतात याचा ऊहापोह या शोधनिबंधात केला आहे.

## शोधनिबंधाची उद्दिष्टे :

१. यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांचा शोध घेणे.

२. सद्य:स्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी यशवंतराव चव्हाणांच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता स्पष्ट करणे.

**शोधनिबंधाची अभ्यास पध्दती :**

सदर शोधनिबंध दुय्यम सामग्रीवर आधारित असून आर्थिक विचारांचा शोध घेण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांची प्रकाशित भाषणे, यशवंतराव चव्हाण यांच्या विषयीचे तज्ञांचे साहित्य,संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रातील तज्ञांचे लेख यांचा आधार घेतला आहे.

**यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार व त्यांची उपयुक्तता :**

यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांची मांडणी ही त्यांची आंतरराष्ट्रीय अर्थनीती, राष्ट्रीय अर्थनीती, राज्याच्या विकाससंबंधित आर्थिक विचार या स्वरूपात करता येईल.

**आंतरराष्ट्रीय स्तरावर मांडलेले आर्थिक विचार :**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने आंतरराष्ट्रीय चलनपध्दतीस स्थिरता देण्याच्या दृष्टीने २० राष्ट्रांच्या प्रतिनिधींची एक समिती नियुक्त केली होती. यशवंतराव चव्हाण हे त्यावेळी भारताचे अर्थमंत्री ;१९७० ते १९७४द्ध असल्याने त्यांनी भारताची भूमिका समितीसमोर मांडली. केवळ भारताचीच ती भूमिका नव्हती तर समग्र विकसनशील देशांच्याच अपेक्षा त्यांनी समितीसमोर मांडल्या. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीत विकसनशील देशांना डावलले जाते हे त्यांना मान्य नव्हते. आंतरराष्ट्रीय चलनविषयक सुधारणासंबंधी घ्यावयाच्या निर्णयात सहभागी होण्याचा हक्क विकसनशील देशांना आहे. त्या संदर्भात विषमता असू नये. विकसनशील देशांना आपल्या समस्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडता याव्यात यासाठी हा सहभाग महत्वाचा ठरतो हे त्यांनी ठासून सांगितले.

विकसनशील देशांना परकीय चलनाची अधिक गरज असते आणि त्यांना नेहमीच परकीय चलनाची टंचाई भासते. अशा परिस्थितीत मदत करणारे देश त्यांच्यावर दबाव टाकतात हे योग्य नाही. यामुळे विकसनशील देश व विकसित देश यांच्यात सहकार्याऐवजी संघर्ष निर्माण होईल.

नाणेनिधीने दबाव तंत्राऐवजी सहकार्य विकसित केल्यास जागतिक शांततेसाठी ते अधिक उपयुक्त ठरेल.

आंतरराष्ट्रीय चलन पध्दतीत निर्माण होणारा असमतोल दुरूस्त करण्यासाठी समायोजन पध्दतीचा स्वीकार करताना विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेची वैशिष्टये, त्यांची विकासाची गती, विकास कार्यक्रम, त्यांना मिळालेला विशेष उचल अधिकार ैःचमबपंस क्तूंपदह तपहीजेद्धए आंतरराष्ट्रीय अर्थसहाय्य यातील संबंधाचा विचार करून विकसनशील राष्ट्रांवर अधिक बोजा पडणार नाही हे जाणीवपूर्वक लक्षात ठेवावे असे त्यांचे मत होते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने विशेष उचल अधिकाराचे मूल्य बलाढय चलनाशी निगडीत ठेवले आहे. तसेच त्यांचे वाटप करताना देशांचा नाणेनिधीतील कोटा विचारात घेतला जातो. ही पध्दती सर्वांना समान न्याय देणारी नसून विशेष उचल अधिकाराचा संबंध विकास सहाय्याशी जोडल्यास विकसनशील देशांना ते अधिक उपयुक्त ठरेल. त्याचा व्याजदरही अल्प असावा हे मुद्दे आपल्या भाषणातून त्यांनी विशेषत्वाने मांडले. मात्र विकसित राष्ट्रांनी विशेष उचल अधिकाराचा संबंध विकासाशी जोडू नये अशी भूमिका घेतली. तेव्हा यशवंतराव चव्हाणांनी ती खोडून काढल्याचे दिसते.

विकसित राष्ट्रांच्या नाणेनिधीतील वर्चस्वाचा व दबावाचा यशवंतराव चव्हाणांनी त्यावेळी उल्लेख केला होता तद्नंतर १९९१ मध्ये याच आंतरराष्ट्रीय संस्थांच्या दबावाला बळी पडून भारताने जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरणाचे धोरण स्वीकारले. प्रचंड मोठी लोकसंख्या व प्रचंड मोठी बाजारपेठ असणाऱ्या विकसनशील देशांनीच स्व विकासासाठी एक दबाव गट निर्माण करणे आवश्यक आहे हे आजचे वास्तव आहे. विकसनशील देशांचे या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहाय्याने सशक्तीकरण व आंतरराष्ट्रीय सहकार्यातून स्थिर व जागतिक अर्थव्यवस्थेकडे वाटचाल हे त्यांचे विचार सद्य:स्थितीत महत्वाचे वाटतात.

**कृषी औद्योगिक समाजरचना :**

२१ फेब्रुवारी १९५९ रोजी मुंबई येथे विदर्भ विकास परिषदेच्या उद्घाटनापर भाषणातून, १मे १९६० रोजी महाराष्ट्राच्या पहिल्या मंत्रिमंडळाच्या शपथविधी प्रसंगी, ७ ऑक्टोबर १९६० रोजी महाबळेश्वर येथे कॉग्रेस कार्यकर्त्यांच्या शिबिरात केलेल्या मार्गदर्शनपर भाषणातून, १९ मे १९६१ रोजी मुंबई येथे आर्थिक विकास महामंडळाच्या सभेमध्ये केलेल्या व्याख्यानातून, २८डिसेंबर १९६९ रोजी मुंबई येथे भरलेल्या अखिल भारतीय कॉग्रेसच्या ७३ व्या अधिवेशनातील आर्थिक ठराव मांडताना केलेल्या वक्तव्यातून त्यांनी 'कृषी औद्योगिक समाजरचना' ही संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते भारताची औद्योगिक योजना ही कृषीकडे दुर्लक्ष करून पुढे जाऊ शकत नाही. शेती हा अत्यंत महत्वाचा उद्योगधंदा असून त्याला धरूनच आपली औद्योगिक रचना असली पाहिजे. ग्रामीण सुधारणा विषयीचा शासनाचा दृष्टीकोन स्पष्ट करताना ते म्हणतात, ''आपल्या पंचवार्षिक योजनेत सर्व भर ग्रामीण भागातील सुधारणा करण्यावर देण्यात आला आहे. ग्रामीण भागात नवचैतन्य निर्माण करण्याच्या ध्येयास सरकार कटीबध्द आहे या दृष्टीने शेतीच्या उत्पादन पध्दतीचे आधुनिकीकरण करणे आणि ग्रामीण विभागांमध्ये विजेचा प्रसार करणे, छोटया उद्योगधंद्यांच्या वाढीस चालना देणे या उपक्रमांना अग्रक्रम देण्यात येईल. शेतीशी संबंधित उद्योगधंद्याच्या क्षेत्रात सहकारी पध्दतीस प्राधान्य देण्याबाबत शासनाचा आग्रह राहील.'' तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत कृषि औद्योगिक समाजरचना निर्माण करण्याचे उद्दिष्ट स्वीकारले होते. कृषि औद्योगिक समाजरचनेची व्याख्या करताना ते म्हणतात, ''ग्रामीण भागात उद्योगधंद्याची निर्मिती करून ग्रामीण जीवनाशी ते उद्योग एकजीव करावयाचे आणि शेती व ग्रामीण उद्योगधंदे यांची सांगड घालायची. ग्रामीण भागात शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे निर्माण झाल्यास शहरी भागातील उद्योगधंद्याकडे कच्च्या मालाची वाहतूक करण्याचे परिश्रम वाचतील. शिवाय, ग्रामीण भागातील या उद्योगधंद्यामुळे शेतकरी वर्गास रोजगारीचे एक साधन उपलब्ध होईल व त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांच्या राहणीमानाचा दर्जाही सुधारेल.''

यशवंतराव चव्हाणांनी मांडलेले कृषिऔद्योगिकविकासाचे प्रारूप हे केवळ वैचारिक बैठकीवर अवलंबून नव्हते तर त्याला व्यावहारिक जोड त्यांनी दिली होती. एकाच वेळी स्थानिक साधनसंपत्ती, स्थानिक मनुष्यबळ, स्थानिक बाजारपेठेची उपलब्धता हा अर्थ त्यांना अभिप्रेत होता. या प्रक्रियेमध्ये खेडयातील शेतकरी, लघु व कुटीर उद्योजक, श्रमिक यांच्या सहकाऱ्याने ग्रामीण विकासाचे स्वप्न त्यांनी रंगविले होते. महात्मा गांधींच्या 'खेडयाकडे चला' या संदेशाशी हा दृष्टीकोन जवळचा वाटतो.

आजही भारताच्या विकासाचे नियोजन करताना सरकारने विकेंद्रीकरणावर भर दिल्याचे दिसते. तसेच ११व्या व १२व्या पंचवार्षिक योजनेमध्ये सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट स्वीकारल्याचे दिसते. त्याच विचारांची मांडणी १९६० च्या दशकामध्ये यशवंतराव चव्हाण यांनी केल्याचे दिसते. विकास प्रक्रियेत समाजातील सर्व वर्गाचा विकास झाला नाही तर विषमतेची बिजे निर्माण होऊन वर्ग संघर्ष उद्भवतो. सामाजिकदृष्टया एकसंघ समाजच प्रगती करू शकतो असे मत त्यांनी मांडले.

## शेतीमाल किंमतविषयक धोरण :

प्रत्यक्ष शेतीमाल उत्पादित करणाऱ्या शेतकऱ्याला मिळणारी किंमत व ग्राहकाला दयावी लागणारी किंमत यात प्रचंड तफावत असते. ही तफावत मध्यस्थांच्या साखळीने निर्माण होते. शेतीमालाला वाजवी भाव मिळाला पाहिजे व ग्राहकालाही तो भाव रास्त वाटला पाहिजे. त्यासाठी हे मध्यस्थ नष्ट होणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते. त्यासाठी उपाय सुचविताना ते म्हणतात, ''सरकारनेच सर्व अन्नधान्याचा व्यापार आपल्या हातात घेतला की, शेतकऱ्यालाही योग्य भाव मिळेल आणि ग्राहकांची ही लुबाडणूक होणार नाही.''

सद्य:स्थितीत शेतीमाल आधार किंमत धोरण, अन्न महामंडळामार्फत केली जाणारी खरेदी व सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून वितरण यामध्ये यशवंतराव चव्हाणांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसते.

**सहकार चळवळ :**

महाराष्ट्रात १९५७—५८ नंतर सहकारी चळवळीचा वेगवान विकास झाला. या काळात महाराष्ट्राचे राजकीय नेतृत्त्व हे यशवंतराव चव्हाण यांच्याकडे होते. यशवंतराव चव्हाण यांच्या मुलभूत विचारांना पोषक अशीच ही सहकारी चळवळ असल्याने त्यांनी या चळवळीच्या वाढीसाठी व विकासासाठी प्रयत्न केले. सहकारी चळवळ ही जनतेची व्हावी अशी त्यांची अपेक्षा होती. सहकारी चळवळ ही मूलत: लोकशाही चळवळ आहे. या चळवळीमागील हा दृष्टिकोन समजावून घेतला पाहिजे आणि लोकशाहीचे स्वरूप कोठेही डागाळणार नाही याबाबत दक्ष असले पाहिजे असे ते मानत. सहकारातूनच समाजवाद निर्माण होईल अशी त्यांची धारणा होती. १९६० साली सहकारी चळवळीला कलाटणी देणारे एक विधेयक ते मुख्यमंत्री असताना त्यांनी नागपूरच्या विधानसभेच्या अधिवेशनात मांडून संमत करून घेतले. त्यांच्याच काळात सरकारने महाराष्ट्रात १८ सहकारी साखर कारखान्यांची प्रथम नोंद करून नवा विक्रम केला. परंतु केवळ साखर कारखानेच नव्हे तर सहकारी खरेदी—विक्री संघ, सहकारी दूध संघ, सहकारी प्रक्रिया संघ, प्राथमिक सहकारी संस्था, सहकारी बॅंकाची स्थापना व्हावी यासाठी प्रयत्न केले. महाराष्ट्राचा आर्थिक विकास साध्य करायचा असेल तर ही चळवळ ग्रामीण भागात रूजविली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाने महाराष्ट्रात जितका सहकाराचा विकास झाला तितका दुसऱ्या राज्यात झालेला दिसून येत नाही. सहकारातील चुकाही ते दाखवून देत. सहकारातील नेतृत्त्वावर त्यांचा वचक होता.

आजही त्यांचे विचार सहकाराला तंतोतंत लागू पडतात. सहकारातील लोकशाहीला तडा गेल्याने व नैतिकता ढासळल्याने सहकाराचा डोलारा कोसळू लागला आहे. साम्यवादातील व्यक्तीस्वातंत्र्याचा ऱ्हास आणि भांडवलशाहीतील अतिरेक पहाता सहकार हा सुवर्णमध्ये आजही योग्य वाटतो.

**बॅकांच्या राष्ट्रीयीकरणाविषयी भूमिका :**

केंद्रिय पातळीवर बॅकांच्या राष्ट्रीयीकरणाचा निर्णय १९६९ मध्ये आला असला तरी भारतात ही भूमिका प्रथम यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्राने मांडल्याचे दिसते. १९६४ साली टिळक भवन येथे झालेल्या महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस समितीच्या बैठकीत अशा पध्दतीचा ठराव यशंवतराव चव्हाणाच्या प्रेरणेने एकमताने संमत करून तो आखिल भारतीय कॉग्रेस समितीकडे पाठविला होता.

बॅकींग व्यवसायावर बऱ्याच अंशी सरकारचे नियंत्रण असल्यामुळेच २००८—०९ मध्ये जगभरात आलेल्या मंदीने भल्याभल्या अर्थव्यवस्था गडगडल्या मात्र भारतीय अर्थव्यवस्था ही वित्तीय संकटातून तरून निघाल्याचे दिसते.

**भाववाढीची कारणमिमांसा व उपाययोजना :**

वाढता योजनाबाहय खर्च, वाढलेला चलनपुरवठा, शेती व औद्योगिक उत्पादनातील कमतरता ही भाववाढीची कारणे सांगून त्यावरील अत्यंत समर्पक उपाय त्यांनी सुचविले. अर्थमंत्री पदावर असताना काही निश्चित पावले उचलली. औद्योगिक उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाच्या आयातीवरील बंधने कमी केली. शेती क्षेत्रातील उत्पादन वाढविण्यासाठी मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प हाती घेण्यात आले. वाहतूक, दळणवळण व अन्य पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देण्यात आला. आवश्यक वस्तूंच्या साठेबाजीविरूध्द कडक कारवाई करण्याचे ठरविले.

१९७१ मधील भाववाढीची त्यांनी सांगितलेली कारणे व सुचविलेले उपाय सद्य:स्थितीतील भाववाढीसाठी लागू पडतात.

**आठव्या वित्त आयोगातील शिफारशी :**

२१ जून १९८२ रोजी केंद्र सरकारने यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आठव्या वित्त आयोगाची स्थापना केली. ३० एप्रिल १९८४ रोजी या आयोगाने आपला अंतिम अहवाल

केंद्रसरकारला सादर केला. या आयोगाने केलेल्या सर्व शिफारशी सरकारने स्वीकारल्या. ज्या राज्यांची अंदाजपत्रके तुटीची होती अशा १० राज्यांना अनुदान देण्यात यावे. राज्य कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणेच महागाई भत्ता देण्यात यावा. दुर्बल १६ मागास राज्यांना विशेष अनुदान देण्यात यावे. राज्यांना नैसर्गिक आपत्तींना तोंड देता यावे यासाठी केंद्राने आर्थिक मदत दयावी. केंद्राकडून राज्यांना मिळणाऱ्या कर्जात मागास व कमी उत्पन्न पातळी असलेल्या राज्यांना सूट देण्यात यावी. तंबाखू, साखर, सुती कापड उद्योगांवर अतिरिक्त उत्पादन कराच्या बाबतीत राज्यांची लोकसंख्या व उत्पादन यांच्यामध्ये समन्वय साधून कर आकारणीचे धोरण ठरवावे. केंद्रिय उत्पादन शुल्काच्या ४५: निव्वळ महसूल राज्यांना द्यावा. एकंदरीत देशाच्या आर्थिक विकासाबाबतचा त्यांचा दृष्टिकोन, मागास प्रदेशाच्या विकासासंबंधीचा दृष्टिकोन हा समन्यायी तत्त्वावर आधारलेला होता. हे या शिफारशीमधून दिसून येते.

**निष्कर्ष :**

यशवंतराव चव्हाण यांनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य पातळीवर मांडलेले आर्थिक विचार हे अर्थशास्त्रीय सिध्दान्त आणि व्यवहार यांची सांगड घालताना दिसतात. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीत चलनविषयक सुधारणासंबंधी घ्यावयाच्या निर्णयात सहभागी होण्याचा हक्क विकसनशील देशांना आहे. विशेष उचल अधिकाराचा संबंध विकासाशी जोडण्यास ते अधिक संयुक्तिक ठरेल. या विचारांची मांडणी ते आंतरराष्ट्रीयस्तरावर करतात. भारताच्या वेगवान विकासासाठी कृषी औद्योगिक समाजरचनेची गरज ते व्यक्त करतात. शेतीमालाला योग्य भाव मिळण्यासाठी सरकारने शेतीमाल व्यापार हाती घ्यावा हे उपाय ते सुचवितात. सहकार ही मूलत: लोकशाही चळवळ आहे. सहकारातूनच समाजवाद निर्माण होईल अशी त्यांची धारणा होती. बॅकांच्या राष्ट्रीयीकरणासंबंधीचा ठराव प्रथमत: महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस समितीच्या बैठकीत संमत करण्यात आला. नंतर त्या संदर्भात राष्ट्रीय पातळीवर निर्णय झाला. भाववाढीची सार्थ कारणे व ठोस उपाय त्यांनी सुचविले. मागास प्रदेशांच्या विकासासंबंधीच्या शिफारशींचा आठव्या वित्त आयोगातील त्यांचा दृष्टिकोन हा त्यांच्या

समन्यायी तत्वालाच पाठींबा देतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर विकसनशील देशांच्या बाबतीत त्यांनी मांडलेली भूमिका ही आजही महत्वाची वाटते. भारताच्या व महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाची जी मुलभूत सूत्रे त्यांनी सांगितली ती आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही उपयुक्त आहेत.

**संदर्भ :**


१. चव्हाण यशवंतराव, 'नाणे सुधारणा आणि विकसनशील देश', ;१९७९द्ध, 'भूमिका', प्रेस्टीज पब्लिकेशन, पुणे.

२. चव्हाण यशवंतराव, 'पुरोगामी आर्थिक धोरण' ;१९७९द्ध, 'भूमिका', प्रेस्टीज पब्लिकेशन, पुणे.

३. चव्हाण यशवंतराव, 'निवडक भाषणे' ;१९७९द्ध, 'भूमिका', प्रेस्टीज पब्लिकेशन, पुणे.

४. डॉ. देशमुख शिवाजीराव, 'शैलीकार यशंवतराव', ;२००९द्ध, कौसल्या पब्लिकेशन, सोलापूर.

५. वसेकर केशव, 'सहयाद्रीचे वारे : एक अभ्यास', ;१९९९द्धए पवन प्रकाशन, परभणी.

६. 'सहयाद्रीचा सूर्य', ;२०१३द्ध संपादक — डॉ. पाटील जे. एफ., प्रकाशक — समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, कोल्हापूर .

७. दै. पुढारी, दै. सकाळ, दै. तरूण भारत — तज्ञांचे लेख.